रे.के.नं. २१३/२३

नि.क्र. १५/क

अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र. १ याची जबानी

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,

माझे नाव - विमल कुमार हंसराज शाहु

वय - २१ वर्षे

व्यवसाय - व्यवसाय

राहणार - सोनारीगाव, ता. उरण, जि. रायगड

**<u>सरतपासणी अभियोगपक्षातर्फे सहा. सरकारी अभियोक्ता श्रीमती छापेकर यांच्यामार्फत...</u>**

१. माझे सोनारीगावात किराणा दुकान आहे. दुकान मी सकाळी ६.०० वाजता उघडतो व रात्री १०.०० वाजता बंद करतो. दिनांक ०४.०८.२०२३ रोजी रात्री मी नेहमीप्रमाणे माझे दुकान बंद केले व घरी गेलो. त्यानंतर दुस-या दिवशी सकाळी ७.०० वाजता मी उठलो व दुकान उघडायला गेलो असता माझे दुकानाचे शटर एका बाजूने तोडलेले होते. मी पोलीस ठाणे न्हावाशेवा येथे गेलो. घटनास्थळी पोलीस आले व शटर उघडून दुकानाची पाहणी केली असता दुकानातील सामान चोरीस गेले होते. माझे गल्ल्यातून एकूण रोख रक्कम रू. ३६००/- चोरीला गेले होते. त्यापैकी काही नाणी व काही नोटा होत्या. दुकानासमोर ग्रामपंचायत कार्यालयाच्या सीसी टीव्ही कॅमेरामध्ये घटना रेकॉर्ड झाली होती. पोलीसांनी त्याच्या सहाय्याने आरोपीला पकडले. त्यानंतर मी फिर्याद दाखल केली. आता मला फिर्याद दाखवली, ती तीच आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर असून त्यावर माझी सही आहे. **<u>फिर्याद नि.क्र. १६</u>** वर आहे. घटनेच्या नंतर पोलीसांनी मला परत दिनांक ०६.०८.२०२३

रोजी पोलीस ठाण्यात बोलावले होते व आरोपीला पकडून आणले होते. पोलीसांनी परत माझा पुरवणी जबाब नोंदवला होता. चोरीस गेलेले दुकानातील पैसे मला आजपर्यंत मिळालेले नाहीत. मी आरोपीला ओळखू शकतो, तो न्यायालयात गैरहजर आहे.

**<u>उलटतपास आरोपीतर्फे वकील श्री. अमर पाटील यांच्यामार्फत...</u>**

२. दुकानात माझे आईवडील देखील काम करतात. पोलीसांनी माझा जबाब मला वाचून दाखवला होता. हे म्हणणे खरे आहे की, दिनांक ०४.०८.२०२३ च्या रात्री ९.०० नंतर मी दुकानात गेलो नाही. हे म्हणणे खरे आहे की, दुकानात किती पैसे होते हे मला माहित नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, दुकानाचे शटर बरोबर लावले होते किंवा कसे हे मला माहित नाही. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांनी मला सीसी टीव्ही मधील फुटेज दाखवले नव्हते. सीसी टीव्ही फुटेज मला कुठे दाखवले होते हे मला आठवत नाही. सामान किती गेले, किती आले त्याच्यासाठी आमच्याकडे वेगळे रजिस्टर नाही. फिर्याद देण्यापूर्वी मी कुठेच गेलो नव्हतो. ६ तारखेनंतर मी कुठेच गेलो नव्हतो. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांच्या सांगण्यावरून मी आरोपीचे नाव सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, कुठल्याही प्रकारची चोरी माझे दुकानात घडली नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, मी आज खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पूर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्विकृत

उरण, (ल.मु.सय्यद)

दिनांक – २३.०८.२०२४ न्यायदंडाधिकारी प्र. वर्ग, उरण

रे.के.नं. २१३/२३

नि.क्र. १७/क

अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र. २ याची जबानी

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,

| | | |
|---|---|---|
| माझे नाव | - | जावित्री हंसराज शाहु |
| वय | - | ४५ वर्षे |
| व्यवसाय | - | व्यवसाय |
| राहणार | - | सोनारीगाव, ता. उरण, जि. रायगड |

**<u>सरतपासणी अभियोगपक्षातर्फे सहा. सरकारी अभियोक्ता श्रीमती छापेकर यांच्यामार्फत...</u>**

१. आमचे सोनारीगावात किराणा दुकान आहे. आमच्या दुकानाच्या बाजूला स्मशानभूमी आहे. दिनांक ०४.०८.२०२३ रोजी मी दुकानात काम करत होते. सदर दिवशी मी रात्री व्यवस्थिरीत्या दोन ठिकाणी कुलूप लावून बंद करून गेले होते. दुस-या दिवशी सकाळी दुकानात गेले असता दुकानाचे शटर तुटलेले दिसले. सदर घटना आमच्या चाळीत राहणा-या लोकांनी व आजूबाजूच्या लोकांनी पाहिली होती. आम्ही सदर घटनेची माहिती पोलीसांना दिली. पोलीस घटनास्थळी आले, शटर उघडून पाहिले असता गल्ल्यामधील रू. ३६००/- चोरीस गेले होते. दुकानासमोर ग्रामपंचायत कार्यालयाच्या सीसी टीव्ही कॅमेरामध्ये घटना रेकॉर्ड झाली होती. पोलीसांनी त्याच्या सहाय्याने आरोपीला पकडले. मी आरोपीला पाहिले होते. पोलीसांनी माझा बयाण नोंदवला होता. मी आरोपीला ओळखते, तो न्यायालयात हजर नाही.

**<u>उलटतपास आरोपीतर्फे वकील श्री. अमर पाटील यांच्यामार्फत...</u>**

३.  मी दररोज दुकानात काम करते.  सकाळी दुकान उघडायला मी जाते. दुकानाची चावी आमच्या सगळयांकडे आहे.  आरोपी दुकानाच्या शटरची पट्टी बाजूने तोडून आत गेला होता.  हे म्हणणे खरे आहे की, दररोज रात्री गल्ल्यातील पैसे आम्ही घरी घेउन जात होतो.  साक्षीदार स्वत:हून सांगते की, घटनेच्या दिवशी रू. ३६००/- गल्ल्यात ठेउन गेले होते.  पोलीसांनी मला सीसी टीव्ही फुटेज दाखवले होते.  त्यानंतर ते फुटेज मी माझे मोबाईलमध्ये घेतले होते.  हे म्हणणे खरे नाही की, मी सांगितल्याप्रमाणे कोणतीही चोरी झाली नाही.  हे म्हणणे खरे नाही की, मी आज खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पूर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्विकृत

उरण,

(ल.मु.सय्यद)

दिनांक – २३.०८.२०२४

न्यायदंडाधिकारी प्र. वर्ग, उरण